अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : १२-४-२००५.

श्री./ श्रीमती........................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २०-४-२००५ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : विषय पत्रिका व टिप्पणी.
दिनांक : १२-४-२००५.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

बुधवार दि.२०-४-२००५ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत
होणां-या सर्वसाधारण सभेपुढील विषय पत्रिका.

--÷÷--

१. मागील दि.१८-३-२००५ आणि ३१-३-२००५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणें.

२. दुखवटयाचे प्रस्ताव

३. विस्तारीत अंत्योदय अन्न योजना ,अतिरिक्त लाभार्थी अन्न योजनेसाठी अन्नधान्य वितरण अधिकारी,अहमदनगर यांनी निवडलेल्या नावांच्या यादीस मान्यता मिळणें बाबत ऑफिस रिपोर्ट.

४. हॉटेल प्रेमदान चौक ते प्रोफेसर कॉलनी चौकापर्यंतच्या रस्त्यास '' महर्षि दधिची ऋषी '' नांव देणें बाबत ऑफिस रिपोर्ट.

५. मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

नगरसचिव,
अहमदनगर
महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

बुधवार दि.२०-४-२००५ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत
होणां-या सर्वसाधारण सभेपुढील विषयाबाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | मागील दि.१८-३-२००५ आणि ३१-३-२००५रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणें. | नियमाप्रमाणे आहे.इतिवृत्त कायम करणेंस हरकत नाही. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव | टिप्पणी नाही. |
| ३ | विस्तारीत अंत्योदय अन्न योजना ,अतिरिक्त लाभार्थी अन्न योजनेसाठी अन्नधान्य वितरण अधिकारी, अहमदनगर यांनी निवडलेल्या नावांच्या यादीस मान्यता मिळणें बाबत ऑफिस रिपोर्ट. | मंजुरीस शिफारस आहे. |
| ४ | हॉटेल प्रेमदान चौक ते प्रोफेसर कॉलनी चौका पर्यंतच्या रस्त्यास '' महर्षि दधिची ऋषी '' नांव देणें बाबत ऑफिस रिपोर्ट. | मा.सर्वसाधारण सभेपुढे निर्णयास्तव. |
| ५ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही. |

दिनांक १२-४-२००५.
अहमदनगर.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : १ दि. २० - ४ - २००५

<u>प्रस्तावाचा विषय -</u> मागील दि.१८-३-२००५ आणि ३१-३-२००५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>प्रस्तावाचा मजकूर -</u> मागील दि.१८-३-२००५ आणि ३१-३-२००५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.महानगरपालिका सभेपुढे ठेविले.

<u>सर्वसाधारण सभेतील चर्चा -</u>
मा.श्री.सुरेश शेळके - विषय मंजूर.
मा.श्री.कृ.द.जाधव - मागील दि.३१-३-०५ च्या सर्वसाधारण सभेपुढे मुकुंदनगर पाणीपुरवठयाबाबत काय ठराव केला,याची माहिती द्यावी.त्यावर उपायुक्तांनी ठरावाचे मसुद्याबाबत खुलासा केला. त्यानंतर काही नगरसेवक सभागृहामध्ये खाली बसलेले आहेत त्यांचा प्रश्न काय आहे, हे समजून घ्यावे अशी सुचना केली.
मा.श्री.दीप चव्हाण - दि.१८-३-२००५ च्या सर्वसाधारण सभेपुढे गोरक्षनाथ दरवडे यांचा नेमणूकीचा प्रस्ताव महासभेपुढे होता. याबाबत महापालिकेने काय ठराव केलेला आहे,याची विचारणा केली.त्यावर आयुक्त यांनी खुलासा केला की, श्री.दरवडे यांनी ज्या खाजगी केसेस दाखल केलेल्या आहेत त्या काढून घेतल्यानंतर त्यांना कायम नेमणूक देण्यात यावी.याबाबतचा ठरावाचा मसुदा वाचून दाखवण्यात आला.त्यावर मा.श्री.दिप चव्हाण यांनी सांगितले की,स्थायी समितीने तात्पुरती नेमणूक देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.व अखेर मंजूरीसाठी महासभेपुढे सादर, असा ठराव मंजूर केलेला आहे. त्याप्रमाणे ठराव करण्यात यावा.
मा.श्री.अनंत जोशी - उपरोक्त ठरावामध्ये दुरुस्ती करावी. व स्थायी समितीचे ठरावाप्रमाणे ठराव दुरुस्त करुन मंजूर करावा अशी सुचना केली.
मा.डॉ.योगिता सत्रे, सभापती, महिला व बालकल्याण समिती - यांनी चर्चा उपस्थित केली की, महिला व बालकल्याण समितीची रचना दि.२९-१-२००५ रोजी समिती गठीत करण्यात आली व समिती सभापती पदाची सूत्रे माझ्याकडे देण्यात आली.त्यानंतर २-३ कार्यक्रम घेण्यात आले.तथापी मला सांगण्यास खेद वाटतो की, ८ मार्च महिला दिन कार्यक्रमामध्य` आयुक्त,उपायुक्त किंवा अधिकारी हे फिरकलेसुध्दा नाहीत.व प्रशासनाने यात कोणताही सहभाग घेतला नाही.

नगरसचिव यांना औरंगाबाद महानगरपालिकेचे पत्र दि.१-२-२००२ रोजी प्राप्त झाले आहे.व त्याची प्रत समितीला प्राप्त झालेली आहे.मी औरंगाबाद महानगरपालिकेला भेट देऊन समितीची माहिती घेतलेली आहे.परंतु आपल्या महापालिकेकडून याबाबत मला खुलासा झालेला नाही.महिला व बालकल्याण समितीच्या अधिकाराबाबत शासनाकडील पत्रामधे स्पष्ट नमूद केलेले आहे की, सभापती यांना दालन,शिपाई,वाहन इ.सर्व देण्यात यावे.तसेच इतर महानगरपालिकेची माहिती मागविलेली असता त्यामध्ये उचित माहिती प्राप्त झालेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडे ८ डिसेंबर २००४ च्या आदेश अंमलबजावणीबाबत सुचना दिलेल्या आहेत. व त्याची प्रत सर्व महानगरपालिकेला पाठविलेली आहे. तथापी महिला नगरसेवकासाठी दालन, वाहन उपलब्ध करुन दयावे.

आपण वरील वाहने इतर अधिकारी व पदाधिकारी यांना देऊ शकतो. परंतु महानगरपालिकेची आर्थीक परिस्थीती नाजूक आहे काय , त्यामुळे महिला व बालकल्याण कमीटीला वाहन उपलब्ध करुन दिलेले नाही.वाहने देण्यास स्पष्ट नकार दिलेला असतो. महिलांना दुय्यम प्रतीची वागणूक देण्यात येते, असे दिसून येते. बोल्हेगांव.केडगांव इ.विभागांचे महिलांचे मुलभूत प्रश्न पाहण्यासाठी फिरुन माहिती घेणे असताना वाहने दिली जात नाहीत.शासन महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण जरुर करते,परंतु महिलांसाठी १ वाहन उपलब्ध करुन देऊ शकत नाही काय? सादील उपलब्ध करुन दिलेले नाही. तरी महिला व बालकल्याण समितीकरीता विचार करुन निर्णय घ्यावेत.याबाबत प्रशासनाने दखल न घेतल्यास महिला व बाल

समितीच्या सर्व सदस्या तिव्र आंदोलन करण्याचा इशारा देत आहेत. त्यांनंतर त्यांचे प्रस्तावावर सभागृहाने प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांनी सभागृहाचे आभार मानले.

मा.महापौर - महिला व बाल कल्याण समितीला वाहन उपलब्ध करुन दयावे,अशा सूचना देण्यात आल्या.

मा.श्री.वाकळे - जानेवारी,फेब्रुवारी,मार्चपर्यंत गाडी न वापरल्याने महानगरपालिकेचा फायदा झालेला आहे.

मा.प्रभारी आयुक्त - यांनी खुलासा केला की,महापालिकेला गाडया वापराबाबतचे वार्षीक टेंडर बंद झालेले होते. आम्ही दोन्ही उपायुक्त मिळून १ वाहन वापरत आहोत. तसेच कॅश भरण्यासाठी व वसुली विभागासाठी गाडी उपलब्ध करुन दिलेली आहे. परिस्थिती बघून वाहन उपलब्ध करुन दिले जाईल.

मा.श्री.चोपडा - गाडी उपलब्ध करुन देण्यात यावी.

त्यानंतर सर्वश्री अनंत जोशी, आसाराम कावरे, अशोक कानडे यांनी चर्चेत भाग घेतला.

मा.श्री.संदिप कोतकर - यांनी केडगांव पाणीपुरवठयाचा प्रश्न उपस्थित केला.केडगांवला ८-९ दिवस पाणी मिळत नाही.वर्तमानपत्रातील बातम्या प्रशासनाने वाचल्या काय.भूषणनगर पाईपलाईनचा प्रश्न आहे.पाणीपुरवठयासाठी टँकर लावण्यात आलेले आहेत.यासाठी जवळजवळ साडे पाच लाख रुपये खर्च आहे.तथापी पाईपलाइन टाकण्यात येत नाही.याबाबत आम्ही दि.१५-३-०५, २२-३-०५, २९-३-०५ रोजी वेळोवेळी पत्र दिलेले आहे.८ इंची केवळ पाईपलाईन लागते. यावर उपायुक्त यांनी खुलासा केला की, भुषणनगर येथे ८ इंची पाईपलाईन टाकणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. लवकरच काम सुरु करण्यात येईल.याबाबत महापालिकेचे सर्व अधिकारी आपल्याबरोबर आहेत.

मा.श्री.अभय आगरकर -यासंदर्भात महानगरपालिकेने स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे.व मा.सदस्यांनी उत्तरे मांडल्यानंतर भूमिका स्पष्ट करावी,असे सुचविले.

मा.श्री.गारुडकर - योजना ठरावीक कालावधीत राबवावी.यावर उपायुक्त यांनी खुलासा केला की, पीव्हीसी मटेरिअल मिळाल्यानंतर सोमवार,मंगळवार काम सुरु करण्यात येईल.

मा.श्री.कानडे - यांनी चर्चेत भाग घेताना असा प्रश्न उपस्थित केला की, सावेडी विभागाकडील कनिष्ठ अभियंता श्री.मेहेत्रे यांची नगरसेवकांचे जाचामुळे बदली झाली,असे दै.लोकसत्ता वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे.तसेच कंत्राटदार यांनी अर्धवट कामे सोडली आहेत, वस्तुस्थिती काय आहे,याबाबत प्रशासनाने खुलासा करावा. त्यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, वस्तुस्थिती तशी नाही.मेहेत्रे यांची बदली हा प्रशासकीय भाग आहे.त्यामध्ये कोणाचाही संबध नाही. .

मा.श्री.कृ.द.जाधव - यांनी हात वर करुन पीठासीन अधिकारी यांचे लक्ष वेधताना सांगितले की, मी ब-याच वेळ हात वर करुन बोलण्याची संधी मागत आहे. तथापी माझेकडे लक्ष दिले जात नाही. महापौर यांचे माझ्याकडे लक्ष नसते.मा.नगरसेवकांनी महापालिकेत वेळोवेळी पत्राद्वारे केलेल्या सुचनांना प्रतिसाद मिळत नाही. व उत्तरेही व्यवस्थीत दिली जात नाही.मी माझे भागातील नागरीकांचे बरेचसे प्रश्न व विषय उपस्थित केले आहेत.तथापी त्याकडे लक्ष दिले जात नाही. लोकप्रतिनिधींना काही किंमत आहे किंवा नाही? वर्तमानपत्रातून येणा-या बातम्यांकडे लक्ष दिले जात नाही. केडगांव पाणीप्रश्नाची परिस्थिती गंभीर झालेली आहे. जीवनाशी खेळ खेळले जात आहेत.गंभीरतेने दखल घेणे आवश्यक आहे.

नंतर जलविहार बाबत लक्षवेधी प्रश्न उपस्थित करताना सांगितले की, जलविहारमध्ये दिड वर्षापासून रु.१५ फी घेतली जाते.१५०/- रु.मासिक पास असताना २००/-रु.घेतले जातात, ही परिस्थीती दाखवून दिली असताना पुरावे दाखवा असे सांगितले जाते.

--*--

<u>ठराव -</u>

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री.

अनुमोदक : मा.श्री.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ३ दि. २० - ४- २००५

प्रस्तावाचा विषय - विस्तारीत अंत्योदय अन्न योजना ,अतिरिक्त लाभार्थी अन्न योजनेसाठी अन्नधान्य वितरण अधिकारी, अहमदनगर यांनी निवडलेल्या नावांच्या यादीस मान्यता मिळणें बाबत ऑफिस रिपोर्ट.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : अन्न धान्य वितरण अधिकारी,अहमदनगर यांनी त्यांच्याकडेस प्राप्त झालेले विस्तारीत अंत्योदय योजना,अतिरिक्त लाभार्थीची निवडीची यादी त्यांचेकडील पत्र क्र.व.शि.१८ / ०४ दि.१४-१२-२००४ अन्वये इकडेस पाठवुन सदर २६० लाभार्थींच्या यादीस मंजुरी देणें बाबत कळविले आहे.

मा.महाराष्ट्र शासन,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक साविव्य - १००३ / २६७२ / प्र.क्र.१२८८ / ना.पु.२८,मुंबई ३२ दि.१६ ऑक्टोंबर २००३ अन्वये विस्तारीत अंत्योदय अन्न योजना लाभार्थी निवड व अंमलबजावणी बाबत मा.शासन निर्णयानुसार सदर योजने अंतर्गंत लाभार्थी कुटुंबाची निवड करणे करीता प्राथम्य गट खालीलप्रमाणे.

१.ज्या कुटुंबाचे प्रमुख विधवा स्त्रिया अथवा आजारी वा अपंग किंवा ६० वर्षे वयावरील वृध्द आहे व ज्यांना उदर निर्वाहाचे निश्चीत साधन नाही,अथवा सामाजिक आधार नाही.

२.एकटे राहत असलेले दुर्धर आजारग्रस्त / अपंग / विधवा / ६० वर्षा वरील वृध्द ज्यांना कुठलाही कौटुंबिक वा सामाजिक आधार अथवा कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही व इतर ग्रामीण भागात

३.आदिम आदिवासी कुटुंबे --

सदर निकषानुसार निवड करण्यांत आलेल्या २६० ( दोनशे साठ फक्त ) लाभार्थींची यादी अन्नधान्य वितरण अधिकारी,अहमदनगर यांनी इकडेस सादर केलेली आहे. वरील परिपत्रकांत नमूद केल्याप्रमाणे '' एकुण अर्जामधुन ठरविण्यांत आलेल्या संख्येनुसार पात्र लाभार्थींची निवड करण्यांत यावी.लाभार्थींनी अर्ज भरुन दिल्यानंतर अर्जाची छाननी करावी व लाभार्थींची निवड निश्चित झाल्यानंतर संबंधित ग्रामसभा,नगरपरिषदा व महानगरपालिका यांची सदर यादीस मान्यता घेण्यांत यावी. वरील निकषानुसार निवड केलेली प्राथमिक यादी तयार झाल्यानंतर गाववार / वॉडनिहाय / परिमंडळ निहाय याद्या तयार करुन ग्रामसभा / नगरपालिका / महानगरपालिका यांचेकडून तात्काळ करुन घेणेंबाबत परिपत्रकांतील पा.नं.२ वरील मुद्या क्रमांक अन्वये कळविलेले आहे.

मा.शासन परिपत्रकान्वये अन्नधान्य वितरण अधिकारी अहमदनगर यांनी इकडेस सादर केलेल्या विस्तारीत अंत्योदय अन्न योजना अतिरिक्त लाभार्थींच्या अन्न योजनेकरीता निवडलेल्या २६० ( दोनशे साठ फक्त ) लाभार्थींच्या यादीस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे.

तरी विस्तारीत अंत्योदय अन्न योजना अतिरिक्त लाभार्थी अन्न योजनेसाठी अन्नधान्य वितरण अधिकारी अहमदनगर यांनी निवडलेल्या २६० लाभार्थींच्या यादीस मंजुरी मिळणेंकरीताचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर.

यावर मा.उपायुक्त ( कर ) यांचा अभिप्राय की, '' अ प्रमाणे सदर विषय मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणें योग्य.''

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की,'' सदरचे यादीवर संबंधित वॉर्डचे प्रभारी विभाग अधिकारी यांचे निवडलेल्या व्यक्तींचे पात्रतेबद्यल अभिप्राय ७ दिवसांत घेवून फेरसादर करा.''

यावर सु.ज.यो.प्रमुख यांचा फेरसादर रिपोर्ट की, '' मा.आयुक्त साहेब,अहमदनगर

महानगरपालिका,अहमदनगर यांनी विस्तारीत अंत्योदय योजना,अतिरिक्त लाभार्थीची निवडीची अन्नधान्य वितरण अधिकारी,अहमदनगर यांनी तयार केलेली लाभार्थींची यादी मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीकरीता ठेवणें बाबतच्या दि.१७-१-२००५ रोजीच्या ऑफिस रिपोर्टावर " अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी निवडलेल्या व्यक्तींचे पात्रतेबद्यल संबंधित वॉर्डचे प्रभारी विभाग अधिकारी यांचे अभिप्राय ७ दिवसात घेऊन सदरचा विषय फेरसादर करणें बाबत आदेशित केलेले होते.

सदरच्या आदेशाप्रमाणे १.श्री.आर.अे.देशमुख,सहाय्यक आयुक्त,सावेडी विभाग २.श्री.आर.एम.ढाकणे,प्रभारी विभाग अधिकारी,केडगांव विभाग ३.श्रीमती.निलिमा बंडेलू ,प्रभारी विभाग अधिकारी,फकिरवाडा विभाग यांना अहमदनगर मनपा सुजयो जा.क्र.१२६ दि.१९-१-२००५ च्या कार्यालयीन आदेशाद्वारे सदर २६० व्यक्तिंच्या पात्रतेबाबत अहवाल सादर करण्यांस्तव शासन निर्णय क्रमांक : साविव्य १००३ / २६७२ / प्र.क्र.१२८८ / नापु २८ दि.१६ ऑक्टोंबर २००३ च्या परिपत्रकांसह लाभार्थींची यादी पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यांत आलेली होती.

तदनंतर अन्नधान्य वितरण अधिकारी,अहमदनगर यांनी त्यांचेकडील जा.क्र.१९८ / २००५ दि.१५-२-२००५ च्या पत्रान्वये सदरच्या यादीस मंजुरी देणेंबाबत विनंती केलेली आहे. तसेच मा.जिल्हा पुरवठा अधिकारी,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक / पुरवठा / कार्या - २१ क / ३० / २००५ / अहमदनगर च्या पत्रान्वये विस्तारीत अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत लाभार्थींना कार्ड द्यावयाचे असल्यांने २६० लाभार्थीची निवड करुन व यादी मंजुर करुन लाभार्थींच्या कार्डवर शिक्के मारणें कामी यादी मंजुर करावी.वरील पत्राद्वारे इकडेस कळविले आहे.

वरील तीनही प्रभारी विभाग अधिकारी यांच्याकडुन अहवाल प्राप्त न झाल्याकारणांमुळे,अहमदनगर मनपा सुजयो जा.क्र.१५० दि.१६-३-२००५ अन्वये त्यांना स्मरणपत्र देऊन विस्तारीत अंत्योदय योजनेच्या त्यांच्या विभागातील लाभार्थींच्या पात्रतेबद्यलचा अहवाल त्वरीत सुजयो विभागाकडे सादर करणें बाबत कळविले होते.

केडगांव विभाग उपकार्यालयाचे प्रभारी विभाग अधिकारी यांनी त्यांच्याकडील लाभार्थी यादीची तपासणी करुन असे कळविले आहे की,या यादीपैकी अ.क्र.८५ व १३८ हे मयत असुन यादीतील अ.क्र.१०१,१२१,१२३,१२५,१२९,१४६ व १५० असे एकुण ७ लाभार्थी मनपा कर्मचारी असुन झोनमधील इतर लाभार्थी बाबत अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्या मताशी त्यांनी सहमती दर्शविलेली आहे.

फकिरवाडा विभाग उपकार्यालयाचे विभाग प्रमुख यांनी त्यांच्या झोन मधील लाभार्थी यादीची तपासणी करुन असे कळविले आहे की,सदर यादी झोन मधील स्वस्त धान्य दुकानांत जावुन चेक केली.तसेच समक्ष निरिक्षण केले असता चारही दुकानांतुन ४१ लोकांची नांवे आढळुन आली.व त्यांचे घरी जाऊन समक्ष पाहणी केली. तसेच झोन मधील इतर लाभार्थी बाबत मा.अन्न धान्य वितरण अधिकारी,अहमदनगर यांनी मा.शासन निर्देशानुसार अंतिम यादी केलेली असल्यांने त्या यादीशी सहमत आहे.असे कळविले आहे.

सावेडी विभाग उपकार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांनी त्यांच्या झोनमधील लाभार्थी यादीची तपासणी करुन असे कळविले आहे की,तपासणी केलेल्या ३४ लाभार्थी पैकी १५ लाभार्थी पात्र ८ लाभार्थी अपात्र,९ लाभार्थी आढळुन येत नाही,१ लाभार्थी परगांवी व १ लाभार्थी मयत आहे.असे इकडेस कळविले आहे.

तरी तीनही प्र.विभाग अधिकारी यांच्याकडील प्राप्त अहवालाप्रमाणे २६० लाभार्थीपैकी २३२ लाभार्थी पात्र,१५ अपात्र,०९ लाभार्थी आढळुन आलेले नाहीत.३ लाभार्थी मयत व १ लाभार्थी परगांवी असा अहवाल प्राप्त झालेला आहे.

तरी तीनही प्रभारी विभाग अधिकारी यांचे अहवाल विचारात घेऊन मा.अन्नधान्य वितरण अधिकारी यांचेकडुन प्राप्त झालेल्या यादीस मंजुरी मिळणें करीताचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेंच्या आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त ( कर ) यांचा अभिप्राय की," अ " प्रमाणे झोनल अधिका-यांकडुन पात्र लाभार्थ्यांबाबत अहवाल प्राप्त आहे. सदर प्राप्त यादीप्रमाणे पात्र लाभार्थ्यांच्या यादीस मंजुरी देण्यांबाबत विषय मा.महासभेपुढे ठेवणे योग्य वाटते.मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, " प्रस्ताव " अ " सहमत.मयताचे वारस पात्र असलेस त्यांचा समावेश होणेंस हरकत वाटत नाही.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( कर ) ,मा.आयुक्त यांचे अभिप्रायासह व सुजयो प्रमुख यांचे फेरसादर रिपोर्टासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभे पुढे ठेविला.

चर्चा - मा.श्री दिप चव्हाण,मा.श्री सुरेश शेळके,मा.श्री कैलास गिरवले यांनी भाग घेतला.श्री गिरवले यांनी सांगीतली की, लाभ धारकाबाबत फेर सर्व्हे करुन कार्यवाही करणेत यावी.

ठराव - ऑफीस रिपोर्ट मंजूर नियमानूसार कार्यवाही करणेत यावी. परंतु अन्न धान्य वितरण अधिकारी यांनी तयार केलेल्या यादी व्यतिरिक्त अनेक लाभधारक आहेत यांचाही सर्व्हे करण्यात यावा.व समावेश करावा अशाबाबत कळविण्यात यावे. ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक - श्री सुरेश शेळके, अनुमोदक - श्री कैलास गिरवले,

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ४ दि. २० - ४ - २००५

---

<u>प्रस्तावाचा विषय -</u> हॉटेल प्रेमदान चौक ते प्रोफेसर कॉलनी चौकापर्यंतच्या रस्त्यास '' महर्षि दधिची ऋषी'' नांव देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

<u>प्रस्तावाचा मजकूर -</u> अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील सावेडी भागातील हॉटेल प्रेमदान ते प्रोफेसर कॉलनी चौक पर्यंतच्या रस्त्यास '' महर्षि दधिची ऋषी '' नांव देणेबाबत दैनिक भास्करचे जिल्हा प्रतिनिधी श्री.संजीव दायमा यांनी दि.२५-१-०५ रोजी अर्ज देऊन वरील रस्त्यास नांव देणेची मागणी केलेली आहे.

वरील ठिकाणच्या रस्त्यास यापूर्वी बांधकाम विभागाकडून कोणतेही नांव दिलेले नाही. तरी सदरच्या रस्त्यास '' महर्षि दधिची ऋषी '' नांव देणेसाठी प्रस्ताव महानगरपालिकेचे सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस मंजूरी मिळावी.

यावर मा.आयुक्त साहेब, यांचा शेरा की, '' सध्या या रस्त्यास काही नांव आहे काय? ''

त्यावर दि.२२-३-०५ ने फेरसादर की,'' सदर रस्त्यास नांव देणेकामी यापुर्वी नांव देण्यात आले किंवा काय याबाबत सार्व.बांधकाम विभागाकडील रजिस्टर पाहता यापुर्वी सदर रस्त्यास नांव देण्यात आलेले नाही. तरी आदेशार्थ सादर. ''

यावर मा.आयुक्त साहेब, यांचा अभिप्राय की, '' सहमत ''

अशा बाबतचा कार्यालयीन प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह व फेरसादर रिपोर्टासह मा.महानगरपालिका सभेपुढे ठेविला.

<u>ठराव -</u> ऑफिस रिपोर्टनुसार प्रेमदान चौक ते पंडीत दिनदयाळ चौक पर्यंतचे रस्त्यास ''दधिची ऋषी पथ'' असे नांव देण्यास मंजुरी देण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी. खर्च मंजूर.

यापूर्वी देण्यात आलेल्या रस्त्यांच्या नांवाचे बोर्ड करुन घ्यावेत व १ महिन्याचे आत संबंधीत ठिकाणी सदरचे बोर्ड लावण्याची नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. खर्च मंजूर.

ठराव सर्वानुमते मंजूर.
सुचक : मा.श्री.मिलींद गंधे.
अनुमोदक : मा.श्री.अनंत जोशी.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.